**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. ०१**

नाव – अयोध्याबाई अंकुश चांदूरे,
वय – ४६ वर्षे, धंदा – घरकाम व शेती,
रा. मोगरगा, ता. औसा, जि. लातूर.

उलटतपास वादीतर्फे **विद्वान विधीज्ञ श्री. यु. बी. पाटील** यांच्यामार्फत–

**०४.** माणिक हा आमच्या कुटूंबाचा कर्ता होता. माणिक याला वादी प्रभावती, छायाबाई, सुनिता या मुली आहेत. तसेच मथुराबाई ही माणिक याची पत्नी आहे. औसा तालुक्यात १९९३ ला मोठा भुकंप झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्र. १ ते ३ मुलींचे विवाह हे सन १९९३ पुर्वीच झालेले आहेत. दावा मिळकत ही माणिक याची वडीलोपार्जित मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माणिक हा त्याच्या हयातीत दावा मिळकतीवर कुटुंबकर्ता म्हणून कब्जे वहिवाटीत होता. दावा मिळकतीच्या वाटण्या झालेल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, वादी व प्रतिवादीचे कूटूँब आजअखेर एकत्र आहेत. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. १८ मौजे मोगरगा ही जमीन आमच्या कुटूंबाच्या एकत्रीत मालकीची होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमीनीपैकी उत्तरेची २० आर जमीन ही बालाजी लकडे याला माझ्या मुलीच्या विवाहासाठी विकली होती.

**०५.** हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखत क्र.२६२४/२०१७ यास वादींची मान्यता नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या कुटूंबातील सर्व लोक शेती व्यवसाय करतात. हे म्हणणे खरे आहे की, माणिक याला नौकरी नव्हती व त्याने त्याच्या कुटूँबाचा उदरनिर्वाह त्याने दावा मिळकतीवर केला. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे खरेदीखत अभिलेखावर दाखल नाही. हे म्हणणे खरे नाही की, माणिकने ४४ आर जमीन तसेच विहीरीतील अर्धा हिस्सा कधीही विक्री काढलेला नाही. खरेदीखत क्र.

२६२४/२०१७ च्या दिवशी माणिक याला दोन ते तीन लाख रुपये दिले होते. दावा मिळकतीचा ताबा खरेदीखतानंतर दोन महिन्यांनी मिळाला होता. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही खरेदी करताना मी माझे सोने मोडून तसेच भावाकडून पैसे घेवून दावा मिळकत घेतली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, कुटूंबाला खाजगी कर्ज व दवाखान्याचा खर्च झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी माणिक याला छळ करत असल्यामुळे त्याने कंटाळून सदरचे खरेदीखत वादीच्या अपरोक्ष मला करुन दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, कौटूंबीक गरज नसताना खोटे खरेदीखत करुन घेतलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर ४४ आर जमीन ही माझी स्वकष्टार्जित मिळकत नसून ती एकत्र कुटूंबाची मिळकत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष देत आहे.
उलटतपास पुर्ण,
फेरतपास नाही.

**श्र. नि. स्वीकृत,**

Digitally signed by PARAG PHADNIS AWATE
Date: 2025.04.05 17:00:51 +0530

**( श्री. आवटे पी. पी. )**

**दिनांक – ०५.०४.२०२५**          **सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, औसा.**
**ठिकाण – औसा**                    **जिल्हा लातूर.**